


**About Us: http://www.galaxyimrj.com/about-us/**
**Archive: http://www.galaxyimrj.com/archive/**
**Contact Us: http://www.galaxyimrj.com/contact-us/**
**Editorial Board: http://www.galaxyimrj.com/editorial-board/**
**Submission: http://www.galaxyimrj.com/submission/**
**FAQ: http://www.galaxyimrj.com/faq/**

# मेळघाटातील आदिवासीच्या शिक्षणाची : दशा आणि दिशा

**प्रा. डॉ. रमेश मधुकर राठोड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी.

**प्रस्तावना :**

अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या जशा मूलभूत गरजा आहे, तशीच शिक्षण ही मानसाची अत्यावश्यक गरज आहे. माणसाला माणसात आणण्याचे काम खऱ्या अर्थाने शिक्षण करत असते. "ज्ञानं मनुजस्य तृतीय नेत्रम् ।" ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे, म्हणून शिक्षण हा सर्वाचा हक्क बनला पाहिजे. शिक्षण हे नवसमाज निर्मितीचे एक महत्त्वाचे साधन असल्याने समाजातील प्रत्येक व्यक्तीस ते सहज उपलब्ध झाले पाहीजे. शिक्षण ही मक्तेदारी नसून ते सर्वांसाठी खुले असले पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, 'गरीव लोक जर शिक्षणापर्यंत येऊ शकत नसतील तर शिक्षणाने त्यांच्याकडे जावे." या पार्श्वभूमीवर गोरगरिब, शोषित, आदिवासी किंवा तळागाळातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे. वरील सर्व बाबीचा विचार केला असता शिक्षण हे मानवी जीवनचे अविभाज्य अंग आहे. परंतु काय खरं ! आज सर्व मानवजातीला समान शिक्षण मिळत आहे. हा संशोधनाचा विषय आहे. जंगल, दऱ्याखोर्यासारख्या दुर्गम भागात राहणारा आदिवासी समाज हा खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या प्रवाहात पाहिजे त्या प्रमाणात आजही आलेला नाही.

**मेळघाटातील आदिवासींची शैक्षणिक स्थिती:**

सातपुड्याच्या कुशीत राहणारा मेळघाटातील आदिवासी हा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. शिक्षण म्हणजे ज्ञान, विवेक, चारित्र्य संवर्धन, जीवन जगण्याची कला हे त्याला अजूनही समजले नाही. गरिबी, दारिद्री हे मेळघाटातील आदिवासी लोकांच्या पाचविला पुजले आहे. भुमिहीन आणि शेतमजूर असलेला आदिवासी हा बारा महिन्यापैकी सात-आठ महिने घर सोडून बाहेर गावी कामाला जातो. दारिद्रय, अज्ञान यांनी ग्रस्त असलेला मेळघाटातील आदिवासी वनातील कंदमुळे,

फळे गोळा करणे, मासे पकडणे, शिकार करणे, शेतमजुरी करणे यातच धन्यता मानतो. गेल्या अनेक वर्षापासून मेळघाटात अनेक सामाजिक संस्था, आश्रमशाळा, शैक्षणिक प्रगतीसाठी आटोकाट प्रयत्न करीत आहे. तरी देखील पाहिजे त्या प्रमाणात शैक्षणिक प्रगती झालेली नाही. 'सन १९४६ पूर्वी मेळघाटात जंगल खात्यामार्फत जनपद सभेतर्फे नगरपालिका व शिक्षण खात्यामार्फत प्राथमिक शाळा चालविण्यात येत असत. १९४६ नंतर आदिवासी कल्याण विभागामार्फत प्रथमतः या भागात १५ शाळा सुरू करण्यात आल्या. पुढे १९५४ नंतर मेळघाट तालुक्यातील सर्व प्राथमिकशाळा आदिम जाती कल्याण विभागाकडे देण्यात आल्या. आदिवासी जमाती कल्याण विभागामार्फत ६३ प्राथमिक शाळा, ३ माध्यमिक शाळा आणि ३ वसतीगृहे चालविली जात असून प्राथमिक शाळेतून २४७७ मुले ९१४ मुली असून ५२० आदिवासी मुली आहे. माध्यमिक शाळेतून १८४ मुले आणि १२ मुली शिक्षण घेत होत्या. त्यात ११८ मुले आणि तीन मुली आदिवासी जमातीच्या होत्या.

**शासकीय आश्रमशाळा :**

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार (अनुच्छेद ४६) राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. याचा परिणाम "अनुसूचित जमाती व अनुसूचित क्षेत्रातील रहिवाश्यांच्या शैक्षणिक समस्या प्रभावीपणे सोडविण्याच्या दृष्टीने अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत निवासाची व भोजनाची सोय करावी आणि सेवा व सहकार्य ही प्रेरणा उराशी बाळगणाऱ्या योग्य शिक्षकाच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली मूलभूत शिक्षण देता यावे म्हणून राज्य शासनाने 'आश्रमशाळा' सुरू करण्याचे ठरविले. सुरुवातीला शासनाने उत्प्रेरकाची भूमिका घेऊन जनजाती शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये ऐच्छिक प्रयत्नांना चालना देणे आणि स्थानिक साधन संपत्तीवर भर देण्याचे ठरविले. अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी

सन १९७२-७३ पासून शासनाने 'निवासी आश्रमशाळा समूह योजना' कार्यान्वित केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने ही योजना मुख्यत्वे करून अतिदुर्गम, डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला/मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून शैक्षणिकदृष्ट्या त्यांना सुशिक्षीत करणे व त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात, दुर्गम पाड्यात पोहचविण्याचे काम शासकीय आश्रमशाळा मार्फत होत आहे. मेळघाट - शैक्षणिक व्यवस्था : 'शिक्षण' हा मानवाच्या प्रगतीतील अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. महाराष्ट्र राज्यात आदिवासी आश्रमशाळा स्थापन झाल्याने आदिवासीच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे. ही अत्यंत समाधानाची बाब आहे. आश्रमशाळा म्हणजे आदिवासींच्या शैक्षणिक विकासातील एक मैलाचा दगड म्हणून काम करत आहे. आज आदिवासीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी,जि. अमरावती अंतर्गत २७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून यामध्ये ०८ कनिष्ठ महाविद्यालय, ०८ माध्यमिक शाळा व ११ प्राथमिक शाळा सद्यस्थितीमध्ये कार्यरत आहेत. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात ४७०९ मुले व ४२८७ मुली असे एकूण ८९९६ आदिवासी विद्यार्थी इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर या प्रकल्पाअंतर्गत २७ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. यामध्ये ०८ कनिष्ठ महाविद्यालय, १४ माध्यमिक शाळा व ०५ प्राथमिक शाळा आहेत. आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, पाठ्यपुस्तके व शालेय साहित्य इत्यादी बाबी मोफत उपलब्ध करून दिल्या जातात.

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून आल्यामुळे हे प्रमाण थांबविण्यासाठी 'इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनिवासी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी शासन निर्णय, मुंबई- ३२, दि. ३१ मे, २०१० व शासन शुद्धीपत्रक क्रमांक आविशी-२००९/प्र.क्र.२०/का-१२, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२, दिनांक २६ ऑगस्ट २०१० नुसार राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक

शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. मेळघाटातील आदिवासीच्या शैक्षणिक मागासलेपणाच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक मागासलेपणा होय वरील योजनेमुळे निश्चितच फरक पडणार आहे.

**मेळघाटातील आदिवासीचे शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याची कारणे** :

आज आश्रमशाळेच्या माध्यमाने आदिवासी क्षेत्रात शिक्षणाची गंगा वाहत आहे. निवास, भोजन व मोफत पाठ्यपुस्तके इत्यादी सुविधा आदिवासी मुला/मुलींना आश्रमशाळेच्या माध्यमातून दिल्या जाते. त्याचबरोबर सक्तीचे सार्वत्रिक व मोफत शिक्षण देण्यासाठी शासनही कटीबद्ध आहे. सरकारने गाव तेथे शाळा ही योजनाही लागू केली. परंतु मेळघाटातील आदिवासी जमातीनी या सुविधेचा लाभ घेतला नाही किंवा त्यांना मिळाला नाही. कारण मेळघाटातील आदिवासी आजही पारंपारिक पद्धतीने जीवन जगायला जास्त पसंद करत असतो. जल-जंगल-जमीन यांनाच आपले सर्वस्वी मानणारा मेळघाटातील आदिवासी

मेळघाटातील आदिवासी जमातीचे शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याची पुढील कारणे सांगता येतात.

**i) भाषेचा प्रश्न :** मेळघाटातील बहुसख्य आदिवासी कोरकू भाषा बोलतात. कोरकू ही हिंदी भाषेने प्रभावित झालेली भाषा आहे. मध्यप्रदेशाची सिमा मेळघाटाला अगदी लागून असल्यामुळे हिंदी भाषेचा प्रभाव या भाषेवर पडलेला असल्याचे दिसून येते. मेळघाट परिक्षेत्र महाराष्ट्र राज्य येत असल्यामुळे प्राथमिक शिक्षणापासून तर महाविद्यालयीन शिक्षण हे मराठी भाषेत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना मराठी भाषेची मोठी अडचण जात असते. अनेक विद्यार्थ्यांना स्पष्ट मराठी भाषा बोलता सुद्धा येत नसल्यामुळे परिक्षेमध्ये त्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते.

**ii) आर्थिक कारण :** शासनाच्या अनेक विकास योजना मेळघाटातील कार्यालयापर्यंत आल्या परंतु त्या अजूनही आदिवासी लोकांपर्यंत पोहोचलेल्या नाही. त्यामुळे आदिवासींचा गरिबीचा प्रश्न आजही सुटलेला दिसून येत नाही. मुलांना शाळेत टाकणे म्हणजे आदिवासी लोकांसाठी फार मोठा आर्थिक

स्वरूपाचा निर्णय असतो. आदिवासीचा मुलगा असो वा मुलगी कमी वयामध्येच प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे कुटूंबाचा आर्थिक भार पेलत असतात. या मुलांच्या शाळेत जाण्याने आदिवासींना आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागतात. त्यामुळे शिक्षणामध्ये आदिवासी मुलांचे/मुलीचे गळतीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

**iii) योग्य शिक्षकाचा अभाव :** आदिवासी भागात घडविले जाणारे बहुसंख्य शिक्षक हे शहरी-ग्रामीण भागातून आलेले असल्यामुळे त्यांना या भागामध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. बरेच शिक्षक हे अप्रशिक्षित असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविताना अडचणी निर्माण होतात. तसेच मेळघाटमध्ये अनेक लोक कोरकू भाषा बोलतात. परंतु शिक्षकांना स्थानिक भाषा येत नसल्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात खऱ्या अर्थाने सुसंवाद साधला जात नाही. 'आता मात्र शासनाने मेळघाटमध्ये शिक्षकांची भरती करताना भाषेचा निकष लावला आहे. त्याकरिता १२ वी पास उमेदवाराला जर तेथील भाषा अवगत असेल तर त्याची प्रशिक्षणाची अट शिथील करून शिक्षक भरतीचे काम २००२-२००३ मध्ये केलेले आहे.

**iv) आदिवासी जल-जंगल-जमीन यांना सर्वाधिक महत्त्व देतात** :शिक्षणामुळे आपले भाग्य उजळू शकते हे आजही आदिवासीला न समजल्यामुळे पारंपारिक जीवनालाच सर्वस्वी मानणारे मेळघाटातील आदिवासी शिक्षणाला आजही महत्त्व देत नाही. जल, जंगल व जमीन यांनाच ते आपले खरे जीवन मानतात. जंगलात जावून शिकार करणे, मासे पकडणे, गुरेढोरे चारणे, तेंदू पत्ता गोळा करणे, निसर्गाच्या सानिध्यात राहणे यातच त्यांना धन्यता वाटत असल्यामुळे शिक्षणाकडे त्यांचे दुर्लक्ष होते.

**v) आदिवासी विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रम :** आदिवासी विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रम हे एक महत्त्वाचे कारण शिक्षणातील गडतीचे असल्याचे दिसून येते. सध्याचे पाठ्यपुस्तकातील पाठ्यक्रम हा मोठ्या शहरात बसून तयार केला जातो. भाषाविषयक पुस्तकातून दिसणारे शहरी अथवा ग्रामीण भागातील

जीवनापेक्षा आदिवासीचे जीवन इतके वेगळे असते की त्यामध्ये त्यांना आवड निर्माण होऊच शकत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढा, भौगोलिक परिस्थिती, धरणे आणि नद्या यापेक्षा त्यांना स्थानिक भागाचा भूगोल, इतिहास, पर्यावरण लवकर समजते. या अशा अभ्यासामुळे मुलांना शिक्षणात आवड निर्माण होत नाही.

मेळघाटातील आदिवासीच्या साक्षरतेचे प्रमाण वाढवायचे असेल तर पुढील गोष्टीचा विचार करावा लागेल : आदिवासी समाजातील लोकांकरिता आर्थिक उन्नतीच्या योजना प्रभावीपणे आदिवासीचा आर्थिक विकास घडवून आणला पाहिजे. त्यासाठी आदिवासी बांधवांना गावशेजारी रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. जेणे करून तो १२ महिने घरीच राहून मुलांच्या पोटाची भूक भागवण्यासोबतच शिक्षणाकडे लक्ष देईल. दारिद्रय पाचवीला पूजलेले असेल, कष्ट, परिश्रम, १८-१८ तास काम करणे उद्याची चिंता कोण करणार. आदिवासी समाजजीवन आणि शिक्षण यांची सांगड घालणे आज आवश्यक आहे.

आदिवासी समाजाचा शैक्षणिक विकास खऱ्या अर्थाने घडवून आणायचा असेल तर त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. त्याकरिता तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करून त्यामध्ये विद्यार्थ्यांचे वयानुसार गट पाडून त्यामध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी, अध्यापनाकरीता कोणते शैक्षणिक महत्त्वपूर्ण साहित्य शिक्षकाने वापरावे, भाषा, व्याकरण, आदिवासी मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता आजही दिसून येते. तो वाढला पाहीजे. संभाषण कौशल्य, सर्व विभागात नोकरी विषयक संधी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण शिबीर यासारख्या अनेक शैक्षणिक माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. उन्हाळी बालसंस्कार शिबीराचे आयोजन शासनाने करावे.

**संदर्भ ग्रंथासूची :-**

१.देवगांवकर श. गो., राजकीय मानवशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८, पृ. ५१.

२.अहेर हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर,१९९५, पृ. क्र. ११७.

३.पाटील अशोक द, कोरकू जन जीवन, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९३, पृ. क्र. १५३.

४.महाराष्ट्राचे जिल्हे, अमरावती प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई., समाजकल्याण व आदिवासी कल्याण, पृ. क्र. ५२.

५.शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील एका दृष्टीक्षेपात शिक्षण,१९९३-९४.

६. धारणी पंचायत समिती व चिखलदरा पंचायत समिती, गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून सन २००३-२००४.

७ माहिती पुस्तिका, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११-१२, पृ. क्र. १३.

८. आश्रमशाळा संहिता, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

९. आदिवासी उपयोजना, आदिवासी विकास शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००-२००१, पृ. क्र. ५३५.